Open Access

उदयगिरी - बहुभाषिक इतिहास संशोधन पत्रिका

(A Bimonthly, Refereed, & Peer Reviewed Journal of History)
Published by: AAASSHER, Mumbai, (MS) India
Journal homepage: https://udayagiri.aaassher.org/
ISSN (Online): 2583-8423
Volume 1, Issue 5, December 2023; Pages 110 – 114
DOI: 10.5281/zenodo.10072741

Original Research Article

# महात्मा गांधीचे राजकीय विचार: एक विश्लेषणात्मक अभ्यास

प्रा. डॉ. सुखदेव पिराजी बलखंडे

विभाग प्रमुख, इतिहास विभाग, कै. बाबुराव पाटील महाविद्यालय, अकोला रोड, हिंगोली ४३१५१३ महाराष्ट्र, भारत

*Corresponding author E-mail*: spbalkhande@gmail.com

Received: 12 October, 2023 | Accepted: 23 October, 2023 | Published: 26 October, 2023

## प्रस्तावना

भारताच्या इतिहासातील एक महान राजकीय विचारवंत म्हणून महात्मा गांधी यांचे नाव घेतले जाते. भारताच्या राष्ट्रीय चळवळीचे नेतृत्व महात्मा गांधीकडे आले. भारताच्या इतिहासात इ.स. 1920 ते 1947 हे गांधी युग ओळखले जाते.

## चरित्र

महात्मा गांधीचा जन्म 02 ऑक्टोबर 1869 रोजी गुजरात मधील पोरबंदर येथे झाला. त्यांचे जन्मनाव आणि पूर्ण नाव मोहनदास करमचंद गांधी असे होते. गांधीजीचे राजकोट संस्थानाचे दिवाण होते. त्यामुळे त्यांना मान, प्रतिष्ठा होती. त्यांची आर्थिक स्थिती ही चांगली होती. गांधीजीच्या आईचे नाव पुतळाबाई होते. त्यांचे आई-वडिल धार्मिक वृत्तीचे होते. त्यांचा प्रभाव महात्मा गांधीजीच्या बाल मनावर निश्चितच पडला होता.

## वकिलीचा व्यवसाय

गांधीजीनी 1892 मध्ये मुंबईला वकिलीचा व्यवसाय सुरू केला. परंतु येथे त्यांचा जम  बसला नाही म्हणून ते राजकोटला गेले. तेथे आपल्या वडिलाबरोबर भावासोबत पुन्हा वकिलीचा व्यवसाय सुरू करु लागले. परंतु तेथेही त्यांना अपयश आले. त्याचवेळी इ.स. 1893 मध्ये दादा अब्दुल्ला यांच्या व्यापारी कंपनीचा खटला चालवण्यासाठी दक्षिण आफ्रिकेत दरबान येथे जावे लागले. तेथे त्यांनी आपल्या खटल्याच्या कामाबरोबरच इतरही कार्य केले.

**महात्मा गांधी यांचे राजकीय विचार**

महात्मा गांधीनी तत्कालीन सर्वच राजकीय प्रश्नांचा समग्रपणे विचार केला आहे आणि त्या संबंधी स्पष्टपणे आपली मते मांडली आहेत. गांधीजींच्या राजकीय विचारानांच गांधीवादी तत्वज्ञान म्हटले जाते. गांधीजीच्या राजकीय विचारांचे वर्णन पुढीलप्रमाणे करता येइल.

**राष्ट्रवाद आणि आंतरराष्ट्रीय वादासंबंधीचे विचार**

गांधीजी राष्ट्रवादी नेते होते. त्यांनीच खऱ्या अर्थाने भारताच्या राजकीय स्वातंत्र्यांची मागणी केली होती आणि प्रत्यक्षात त्यासाठी स्वातंत्र्य आंदोलन सुरु करुन त्याचे नेतृत्वही केले होते. गांधीजीनी राष्ट्रवादाचा पुरस्कार केला होता. परंतु त्यांची राष्ट्रवादाची संकल्पना संकुचीत किंवा उग्रवादी नव्हती. तसेच, त्यांनी राष्ट्रीय स्वातंत्र्यासाठी केलेले आंदोलन अहिंसात्मक स्वरूपाचे होते. सत्याग्रह, सविनय कायदेभंग, बहिष्कार यासारखे मार्ग त्यांनी स्वातंत्र्य आंदोलनात वापरले होते. गांधीजीचा राष्ट्रवादाचा विचार हा व्यापक आणि उदारमतवादी स्वरुपाचा होता. भारतीय राष्ट्रवादाचा त्यांनी, मानव, जातीच्या हिताचा विचार केला होता. 'यंग इंडिया' च्या लेखात म्हटले होते, "संपूर्ण जगाचे हित साधण्यासाठी मी भारताच्या स्वातंत्र्याची अपेक्षा करित आहे. दुसऱ्या राष्ट्राचे शोषण करण्यासाठी किंवा भारताचा साम्राज्यवाद करण्यास भारताच्या स्वातंत्र्याची मी इच्छा करीत नाही."

गांधीजीच्या राष्ट्रवादा संबंधी जवाहरलाल नेहरू म्हटले होते की, “महात्मा गांधीचा राष्ट्रवाद हा आंतरराष्ट्रवादाच्या हा आंतरराष्ट्र वादाच्या जागतिक शांततेच्या हेतुने मांडलेला होता. म्हणून तो आक्रमक स्वरूपाचा नव्हता. आपण जर खरे राष्ट्रवादी असाल तरच आपल्याला आंतरराष्ट्रवादी होता येईल असा विचार गांधीजींनी आंतरराष्ट्रवाद या संबंधी मांडलेला होता.

**साम्राज्यवादासंबंधी विचार**

महात्मा गांधीबीचे विचार राष्ट्रवादी आंतराष्ट्रवादी आणि मानवतावादी होते. त्यामुळे त्यांचा साम्राज्यवादाला विरोध होता. त्याच उद्देशाने त्यांनी भारतातील ब्रिटिशांच्या साम्राज्यवादी धोरणावर आणि राज्यकारभारावर टीका केली होती. तसेच भारताला ब्रिटिशाच्या साम्राज्यातून मुक्त करण्यासाठी आंदोलन सुरू केले होते. गांधीजींनी विविध लेखातून आणि भाषणातून साम्राज्यवादाचे दोष स्पष्ट केले होते. त्यांच्या मते, साम्राज्यवादाचे पुढील प्रकारचे परिणाम आहेत.

**स्वराज्यासंबंधीचे विचार**

महात्मा गांधीजींचे विचार स्वराज्यासंबंधीचे अतिशय महत्वाचे होते. गांधीजींच्या काळात भारत ब्रिटिशांच्या गुलामगिरीत होता. त्यामुळे स्वाभाविकपणे त्यांना भारताच्या स्वराज्यासंबंधी किवा भारताच्या स्वातंत्र्यासंबंधी विचार मांडले आहेत. भारताला राजकीय स्वातंत्र्य प्राप्त झाले तर आपल्याला आपली सामाजिक, आर्थिक व राजकीय ध्येय पूर्ण

करता येतील असे गांधीना वाटते. असे गांधीजींनी आपली स्वराज्याची संकल्पना मध्ये लिहिलेल्या 'हिंद स्वराज्य' या पुस्तकात भिन्न आहे. गांधीजीच्या मते स्वराज्य म्हणजे प्रत्येकाला राज्यकारभार आपला आहे असे वाटणारा विचार होय. स्वराज्य म्हणजे स्वतःचे स्वनियंत्रित राज्य असा स्वराज्याचा अर्थ त्यांनी लावला होता. सर्वोदय हे स्वराज्याचे अंतिम उद्दिष्ट असल्याचे सांगून गांधीजींनी आपल्या स्वराज्याच्या कल्पकतेत ग्रामस्वराज्याला विशेष महत्व दिले.

**लोकशाही संबंधीचे विचार**

महात्मा गांधीजीनी लोकशाही संबंधीचे विचार सविस्तरपणे मांडले आहेत. त्यांच्या मते, सर्वसामान्य लोकांच्या हातात सत्ता सुपर्द करणारी शासनव्यवस्था म्हणजेच लोकशाही होय, आधुनिक काळातील पध्दतीला अनुसरून गांधीजींनी प्रतिनिधिक लोकशाहीचे समर्थन केले होते. त्यांनी लोकशाहीचा विचार एक शासन पद्धतीचा आणि एक प्रकार म्हणून गांधीजींना इंग्लडप्रमाणे संसदीय लोकशाही किंवा अमेरिकेप्रमाणे अध्यक्षीय लोकशाही पसंत नव्हती. त्या ऐवजी भारतासाठी सत्तेचे हिंदी विकेंद्रीकरण असलेली ग्रामधिष्ठित लोकशाही असावी असे त्यांचे मत होते. भारतीय लोकशाही खेडे किंवा ग्राम हा आधारभूत आणि केंद्रबिंदू असला पाहिजे असे ते नेहमी म्हणत.

**समाजवादासंबंधीचे विचार**

गांधीजीनी सुस्पष्ट असा किंवा शास्त्रीय स्वरूपाचा समाजवादासंबंधीचा एखादा सिध्दांत मांडला नाही. परंतु यांच्या एकंदर राजकीय विचारांचे समाजवादी तत्वांचा काही ठिकाणी समावेश झालेला दिसतो. गांधीजींनी मांडलेल्या समाजवादी विचारात अन्याय, अत्याचार, शोषण व विषमता यांना विरोध होता.

गांधीवादी समाजवादात सत्य, अहिंसा आणि समता हे प्रमुख तत्त्वे आहेत. म्हणून गांधीजींनी मांडलेला समाजवाद हा मानवतावादी होता. समाजात कोणताही बदल अहिंसात्मक मार्गाने झाला पाहिजे असे गांधीजींना वाटत होते.

**धर्म आणि राजकारण या संबंधीचे विचार**

महात्मा गांधीजीची एकंदर जीवन पद्धती आणि राजकारण या दोन्हीकडे अध्यात्मवादी मानवतावादी दृष्टिकोनातून पाहिले आहे. त्यामुळे राजकारण हे सुद्धा ईश्वर प्राप्तीचे एक साधन आहे असे त्यांचे मत होते. व राजकारणाचा संबंध असावा किंवा नाही हा भारतीय राजकारणातील नेहमीचाच वादाचा विषय राहिला आहे. गांधीजींच्या राजकीय तत्वज्ञानात मात्र धर्म आणि राजकारण अभिन्न आहेत किंवा हे दोन्हीही एकरूप झालेले आहेत गांधीजींनी राजकारणाला धर्मापासून वेगळे केलेच उलट धर्मावर राजकारणाची उभारणी केली. त्या संबंधाबाबत लिहिले आहे "संपूर्ण मानवजातीशी एकरूप झाल्यावांचून मी धार्मिक जीवन जगू शकत नाही आणि राजकारणात भाग घेतल्याशिवाय मी एकरूपता साधू शकत नाही. या संदर्भात त्यांना असेही लिहिले आहे की, “माझ्यासाठी धर्माला वगळून राजकारण असू शकत नाही. राजकारण हे धर्माचे साधन आहे धर्म विरहित राजकारण हा मृत्यूचा सापळाच आहे. कारण ते आत्म्याचा नाश करते.

**सारांश**

महात्मा गांधीनी वरील प्रकारचे राज्यविषयक विचार मांडून एक वेगळा ठसा उमटविलेला आपल्याला दिसतो. गांधीजीनी राज्य संस्थेला विरोध करण्याचे मुख्य कारण म्हणजे हिंसा हाच राज्यसंस्थेचा आधार असतो. असे त्यांचे मत होते. व्यक्तीच्या स्वातंत्र्यासाठी अधिकाराचे रक्षण करण्याकरिता राज्यसंस्था आवश्यक असते.

**निष्कर्ष**

१. महात्मा गांधीजींनी मांडलेल्या राजकीय विचारांच्या मांडणीस जनसामान्यांच्या इच्छा आकाक्षा व अपेक्षांचे कोंदन होते. सामान्याच्या भावनांचे प्रतिबिंब गाधीजींच्या राजकीय विचारात आपणास दिसून येईल.
२. स्वातंत्र्य चळवळीचे नेतृत्व करत असताना राजकीय विचारांची सांगड ही सामान्य जनतेच्या हितासाठी व कल्याणासाठी शासनकर्त्यांनी केली पाहिजे असा त्यांचा कटाक्ष असायचा.
३. लोकशाही ही सर्वसामान्य लोकाच्या अपेक्षा पूर्ण करत असतो., म्हणून सर्वसामान्यांना केंरदबिंदू म्हणून शासनकर्त्यांनी राज्य करावे ही अपेक्षा ठेवतात
४. धर्म व राजकारण हे एकच असून त्यावरच गांधीजींनी स्वातंत्र्य चळवळीची उभारणी केलेली दिसते.
५. भारतीय राष्ट्रवादासंबंधी त्यांनी संपूर्ण जगाच्या हिताकरिता मी भारतास स्वातंत्र्य देण्याची अपेक्षा बाळगतो असे ते म्हणत असत.
६. महात्मा गांधीचे राजकीय विचार हे स्वातंत्र्य कालखंडातील जनसामान्याचे, दलितांचे, स्त्रीयांचे व शेतकऱ्यांचे प्रतिनिधीत्व करत असे,
७. गांधीजींनी मांडलेल्या विचारांनाच गांधी तत्वज्ञान किंवा विचारप्रणाली म्हणतात. लोकहित व लोककल्याण हे त्यांच्या राजकीय विचारांचे मुख्य सुत्र होते.

**संदर्भ ग्रंथ सूची**

१. माझ्या स्वप्नातला भारत- महात्मा गांधी परमधाम प्रकाशन, पवनार वर्धा 2001, पृष्ठ 45.
२. माझे सत्याचे प्रयोग - मोहनदास करमचंद गांधी (अनुवाद) सिताराम पुरुषोत्तम पटवर्धन, रिया पब्लिकेशन, कोल्हापूर, 2013, पृष्ठ क्र. 17 ते 22
३. आधुनिक भारत का इतिहास, तारिक मुहम्मद टाटा मॅकग्रा हिल्स सिरिज, नवी दिल्ली 2008, पृष्ठ क्र. 187.
४. 'इंडियाज स्ट्रगल फॉर इंडिपेडन्स' - मूळ लेखक- बिपिनचंद्र (मराठी अनुवाद) डॉ. एस.व्ही. काळे, के. सागर पब्लिकेशन्स 2003 पृष्ठ क्र. 103 ते 109.
५. शोध आधुनिक भारताचा सारणी अरुण रविराज प्रकाशन, पुणे 1993 पृष्ठ क्र. 102.
६. हिंदुस्थानच्या स्वातंत्र्यचळवळीचा इतिहास- पवार जयसिंगराव, फडके प्रकाशन, कोल्हापूर 2007 पृष्ठ क्र. 15 ते 17.

७. आधुनिक भारत - प्रा. कोंडेकर. ए. वाय., निराली प्रकाशन, पुणे 1995, पृष्ठ क्र. 24 ते 28.

८. भारतीय स्वातंत्र्य संग्राम-नगरकर, वसंत, प्रेस्ट्रीज प्रकाशन, 1981, पुणे पृष्ठ क्र. 105 ते 110.

९. आधुनिक भारत - डॉ. कठारे अनिल कल्पना प्रकाशन, नांदेड, 1999, पृष्ठ क्र. 99 ते 103.

१०. भारतीय राजकीय विचारवंत - भोळे. भा.ल, विदया बुक्स, औरंगाबाद पृष्ठ क्र. 78 ते 80.